

कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो ३ मार्गाचे काम सध्या वेगाने सुरू असून, सोमवारी हुतात्मा चौक स्थानकावरील बोगद्याचे अंतर्गत काँक्रिटीकरण १०० टक्के पूर्ण करण्यात आले आहे. या भुयारी मेट्रोसाठी 'न्यू ऑस्ट्रियन टनेलिंग पद्धती'चा वापर केला जात आहे. आतापर्यंत या मेट्रोमार्गावर जवळपास ९९ टक्के भुयारीकरण पूर्ण झाले असून, एकूण प्रकल्पाचे काम ७३.०७ टक्क्यांच्या पुढे गेले आहे.